# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:20.05.2026** **वारः बुधवार**

1. अणुऊर्जा निर्मितीसाठी राज्य सरकारचे चार कंपन्यांसोबत सामंजस्य करार,
2. हरित तंत्रज्ञान आणि नवोन्मेष क्षेत्रात नॉर्डिक देशांसोबतची धोरणात्मक भागीदारी आणखी दृढ होण्याचा पंतप्रधानांचा विश्वास
3. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या 150व्या तुकडीचं दीक्षांत संचलन येत्या 30 तारखेला आणि
4. राज्यातल्या 633 गावांना सातशे टँकर्सद्वारे पाणीपुरवठा

**करार**

महाराष्ट्रात अणुऊर्जा निर्मिती करण्यासाठी राज्य सरकारनं चार कंपन्यांसोबत काल सामंजस्य करार केले. नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड, अदानी पॉवर कंपनी, रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि बजाज उद्योग समूहाच्या ललितपूर पॉवर जनरेशन कंपनी लिमिटेड या चार कंपन्यांशी सुमारे साडेसहा लाख कोटी रुपये गुंतवणुकीचे हे सामंजस्य करार असूनयातून 25 हजार 400 मेगावॅट अणुऊर्जा तसंच 1 लाख 23 हजार 500 रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. यावेळी राज्याचे पारंपरिक ऊर्जामंत्री अतुल सावे यांच्यासह या कंपन्यांचे आणि शासनाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**पंतप्रधान**

हरित तंत्रज्ञान आणि नवोन्मेष क्षेत्रातील नॉर्डिक देशांसोबतची भारताची धोरणात्मक भागीदारी आणखी दृढ होईल असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. तिसऱ्या भारत नॉर्डिक शिखर परिषदेनंतर नॉर्वेमध्ये ऑस्लो इथं घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत ते काल बोलत होते. भारत नॉर्डिक देशांमधल्या संबंधात सातत्यानं वाढ होत असून गेल्या दशकात नॉर्डिक देशांची भारतातली गुंतवणूक दोनशे टक्क्यांनी वाढली आहे असं पंतप्रधान म्हणाले. यामुळे भारताच्या विकासाला हातभार लागण्याबरोबरच नॉर्डिक देशांमधल्या रोजगाराच्या संधीही वाढल्या आहेत. भारत आणि नॉर्डिक देशांमध्ये विद्यापीठं, प्रयोगशाळा आणि स्टार्टअप परिसंस्थांमधील भागीदारी दृढ करुन संशोधन, कौशल्य विकास आणि गुणवत्तेच्या आदानप्रदानाला प्रोत्साहन दिलं जात असल्याचं त्यांनी सांगितलं.

दरम्यान, काल रात्री पंतप्रधान इटलीला पोहोचले असून या दौऱ्यात ते इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी आणि राष्ट्राध्यक्ष सर्जिओ माटारेला यांच्याशी द्विपक्षीय सहकार्याबाबत चर्चा करतील.

**संचलन**

पुण्यातील राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या 150 व्या तुकडीचा पदवीप्रदान समारंभ येत्या 29 तारखेला सकाळी 11 वाजता प्रबोधिनीच्या हबिबउल्ला सभागृहात भारतीय पोलिस सेवेच्या निवृत्त अधिकारी आणि पुदुच्चेरीच्या माजी राज्यपाल डॉक्टर किरण बेदी यांच्या उपस्थितीत होणार आहे. दुसऱ्या दिवशी 30 तारखेला सकाळी 6 वाजून 40 मिनिटांनी दीक्षांत संचलन होणार असून त्यासाठी देशाचे लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

**दरवाढ**

पेट्रोल आणि डिझेलच्या दरात काल प्रति लिटर 90 पैसे वाढ झाली. एका आठवड्यापेक्षा कमी कालावधीत झालेली ही दुसरी दरवाढ आहे. मुंबईत पेट्रोल 104 रुपये 59 पैसे आणि डिझेल 94 रुपये 8 पैसे दराने मिळत आहे. पुण्यात पेट्रोलचा दर 107 रुपये 89 पैसे तर डिझेलचा दर 94 रुपये 39 पैसे झाला आहे.

अमेरिका, इस्राईलआणि इराणमधल्या संघर्षामुळे होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी तेल वाहतूक खूपच विस्कळीत झाली आहे. परिणामी जगभरात कच्च्या तेलाच्या किंमतीनी उसळी घेतल्याच्या पार्श्वभूमीवर ही दरवाढ झाली आहे.

**टीका**

पेट्रोल आणि डिझेलच्या दरात 90 पैसे वाढ झाल्याच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. भाजपाने मात्र या वाढीचं समर्थन केलं असून ही दरवाढ इतर देशांपेक्षा कमी आहे, असं म्हटलं आहे.

**मुख्यमंत्री**

आखाती संकटानंतर इंधन बचत, परकीय चलनाचं रक्षण आणि स्वदेशी वस्तूंना प्राधान्य देण्यासाठी एकसंध होण्याचं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. यासंदर्भात त्यांनी समाजमाध्यमावर एक व्हिडिओ जारी केला आहे. जागतिक आव्हानांचा सामना करण्यासाठी 'राष्ट्रप्रथम' या भावनेने सर्व नागरिकांना एका राष्ट्रीय अभियानात सहभागी होण्याचे आवाहन करताना मुख्यमंत्री म्हणाले.....

**अखाती युद्धामुळे ही परिस्थिती ओढावली आहे अशावेळी संपूर्ण देशानं एकसंधपणे उभे राहणे गरजेचे आहे पण आपल्या छोट्या छोट्या बदलातून आपण मोठी देशसेवा करू शकतो हे तुम्हाला लक्षात घ्यायचं आहे नवीन वाहन खरेदी करताना शक्यतोवर ई वाहन खरेदी करा शक्यतेवर सार्वजनिक वाहतुकीचा वापर करा आठवड्यात एक दिवस नो व्हेहिकल डे पाळण्याचा प्रयत्न करा कोविडच्या काळात आपण वर्क फ्रॉम होममध्ये पारंगत झाले आहोत तेही पर्याय पडताळून बघा परदेशातील प्रवास टाळा अशी साधी सोपी कामे आपल्याला करायची आहेत चला आपण सारे मिळून या अभियानात सहभागी होऊया राष्ट्र प्रथम या भावनेने एकजूट होऊया**

**पाणीटंचाई**

राज्यात उन्हाच्या वाढत्या तीव्रतेमुळे अनेक भागांमध्ये पाणीटंचाईची समस्या जाणवत आहे. त्यावर उपाययोजना म्हणून शासनानं राज्यातल्या 15 जिल्ह्यांमधल्या 633 गावं आणि एक हजार सहाशे बावन्न वाड्यांमध्ये सातशे सहा टँकरमधून पाणी पुरवठा सुरू ठेवला आहे. यामध्ये सर्वाधिकम्हणजे 244 टँकर छत्रपती संभाजीनगर विभागासाठी वापरले जात आहेत.

**भटकी कुत्री**

सार्वजनिक ठिकाणी पकडलेल्या भटक्या कुत्र्यांना लसीकरण किंवा निर्बीजीकरणानंतर पुन्हा सोडून दिलं जाऊ नये, हा यापूर्वी दिलेला आपला आदेश मागे घ्यायला सर्वोच्च न्यायालयानं काल नकार दिला. भटक्या कुत्र्यांनी यापूर्वी लहान मुलं, वृद्ध व्यक्ती आणि पादचाऱ्यांवर हल्ले केले आहेत; ही गंभीर समस्या आता विमानतळ आणि निवासी संकुलांपर्यंत पोहोचल्याचं न्यायालयानं नमूद केलं. रेबीज किंवा दुर्धर आजाराने ग्रस्त श्वानांना दया मरण देण्याची परवानगी न्यायालयानं दिली आहे.

**अटक**

70 कोटी रुपयांच्या आर्थिक घोटाळ्यात भोंदूबाबा अशोक खरात याला अटक करण्याची मुभा मुंबईतल्या पीएमएलए न्यायालयानं काल सक्तवसुली संचालनालयाला दिली. लैंगिक अत्याचार आणि फसवणूक, खंडणी वसुली प्रकरणात अशोक खरात याला यापूर्वीच विविध गुन्ह्यांप्रकरणी न्यायालयीन कोठडी देण्यात आली आहे. आता ईडीकडूनही त्याला अटक होऊ शकते. खरात हा एका मोठ्या खंडणी रॅकेटचा सूत्रधार असल्याचा आणि 'बेनामी' बँक खात्यांच्या माध्यमातून त्याने 70 कोटींहून अधिक रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केल्याचा आरोप ईडीने केला आहे.

**छापे**

नीट पेपरफुटी प्रकरणात काल केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग-'सीबीआय'नं नागपूर आणि चंद्रपूर जिल्ह्यात तीन विद्यार्थ्यांच्या घरांवर छापे टाकून झडती घेतली. या कारवाईदरम्यान महत्त्वाची कागदपत्रं, हस्तलिखित नोट्स तसंच इलेक्ट्रॉनिक साहित्य जप्त करण्यात आलं. जप्त करण्यात आलेल्या नोट्स आणि फुटलेल्या प्रश्नपत्रिकांमध्ये साम्य आहे का, याची तपासणी आता फॉरेन्सिक पातळीवर केली जाणार आहे. देशभरातल्या किमान एक हजार विद्यार्थ्यांनी फुटलेले पेपर खरेदी केले असल्याचा सीबीआयचा अंदाज असल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

**प्रधान**

नीट युजी फेरपरीक्षेचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या अध्यक्षतेखाली काल नवी दिल्लीत उच्चस्तरीय बैठक झाली. ही परीक्षा प्रामाणिकपणे आणि संपूर्ण पारदर्शकतेनं घेण्याचा पुनरुच्चार करत प्रधान यांनी परीक्षा प्रक्रियेत याआधी आढळून आलेल्या कोणत्याही त्रुटी न ठेवण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

**हवामान**

कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल तर विदर्भात हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे. विदर्भात काही ठिकाणी उष्णतेची लाट येण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.